**<u>नामनिर्देशनाने नियुक्ती.</u>**
**प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय,**
**महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: नियुक्ती-२०२६/प्र.क्र.२१/ई-१५७०६६८/मशि-१**
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ ऑक्टोबर, २०२६.

**<u>वाचा :-</u>**

१. शासनपत्र क्र. बिंदूना-२०२२/प्र.क्र.३०८/मशि-१, दि.२१.०२.२०२३ व दि.१२.०९.२०२४.
२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. एचडीआर-१३२५/प्र.क्र.६३/२०२५/२९-अ, दि.०२.०२.२०२६

**शासन निर्णय :-**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संदर्भाधीन क्र. १ येथील पत्रांन्वये सादर केलेल्या मागणीपत्रानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या संवर्गातील ०६ पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार आयोगाने पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन संदर्भ क्र. २ येथील दि. ०२ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, गट-अ संवर्गातील पदांवर नियुक्तीसाठी उमेदवारांची शासनास शिफारस केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या खालील तक्त्यात नमूद उमेदवारांना प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावर, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गात व पदस्थापनेच्या कार्यालयात ते प्रत्यक्ष ज्या दिनांकापासून रूजू होतील त्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सरळसेवेने नियुक्ती व पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | मूळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापनेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. सुविद्या शशिकांत महाडेश्वर | खुला (महिला) | खुला (सर्वसाधारण-१) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई |
| २. | श्रीम. शैला रामदासराव वानखेडे | इ.मा.व. (महिला) | खुला (सर्वसाधारण-२) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी |
| ३. | श्री. हर्षानंद पंजाबराव खोब्रागडे | अ.जा. | खुला (सर्वसाधारण-३) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. संजय पुरूषोत्तम शेडमाके | अ.ज. | खुला (सर्वसाधारण-४) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, छ. संभाजीनगर |
| ५. | श्री. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ | इ.मा.व. | खुला (सर्वसाधारण-५) | शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर |

२. उपरोक्त उमेदवारांची प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या पदावर नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१. उपरोक्त उमेदवारांची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार रू.१,३१,४००-२,१७,१००/- (ग्रेड पे-९०००, अकॅडमिक स्तर-१३A) अशी राहील. सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

२. उपरोक्त उमेदवारांचे नियुक्ती कालावधीतील काम किंवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा अनुरुप व समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास ते पात्र ठरतील.

३. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमांच्या अधीन राहून ते मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास ती परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७/८/२००० अन्वये शासनसेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्त उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/ २००१/ ३९, दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

५. उपरोक्त उमेदवारांचे वेतन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. ०८ मार्च २०१९ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

६. सदर उमेदवारांनी नियुक्तीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजू व्हावे व याबाबतचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक यांनी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा. प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात सदर उमेदवारांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

७. उपरोक्त उमेदवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा ती न दिल्यास एक महिन्याचे वेतन शासनास देणे आवश्यक आहे.

८. उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी किंवा नियत वयोमानानुसार वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी राहील. तसेच सदरहू पाच वर्षाचा कालावधी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ८ मार्च २०१९ मध्ये नमूद विहित तरतुदीनुसार व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून आणखी एक वेळेस वाढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

९. श्रीम. सुविद्या शशिकांत महाडेश्वर यांची शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई येथील पदस्थापना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाकडून शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयातील अधिष्ठाता पदावरील नियुक्तीपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत राहील. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठाकडून शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयात अधिष्ठाता पदावरील नियुक्तीनंतर श्रीम. महाडेश्वर यांच्या पदस्थापनेबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१०. उपरोक्त उमेदवारांना उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय दि. १५ मार्च २०११ मधील तरतुदीनुसार मूळ पदावरील धारणाधिकार राहील.

११. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००९/प्र.क्र.३२/सेवा-४, दिनांक १८.०८.२००९ मधील तरतुदींनुसार दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा त्यानंतर अर्ज केला असेल तर अशा प्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दिनांक १२ जानेवारी, २००७ मधील २ ((i) ते (iv) येथे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दिनांक १२ जानेवारी, २००७ रोजीच्या परिपत्रकात २ (i) ते (iv) येथील नमूद सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल.

१२. उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१३. वर नमूद केलेल्या अटी व शर्तींव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिका-यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१०१९१३०२५५९६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHOK SHANKAR MANDE

Digitally signed by ASHOK SHANKAR MANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=FABB29D28CDBCBE5C9EED052CB38B8CB567068A0090E237F095C6E50A52A6CF5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D96FF33E8AF31F745D84F3411F94D896382FAA82659B10108672887A87D6FC7C, cn=ASHOK SHANKAR MANDE
Date: 2026.10.19 13:03:56 +05'30'

**(अशोक मांडे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत.**

१. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
७. सर्व प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय महाविद्यालय/संस्था.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)-महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी. (परभणी, अकोला, छ. संभाजीनगर, कोल्हापूर)
११. श्रीम. महाडेश्वर सुविद्या (सरवणकर सुविद्या), ४०४ ई मार्ग, वसंत गॅलेक्सी, बांगूरनगर, लिंकरोड गोरेगाव (प.), मुंबई, महाराष्ट्र पिन-४०० १०४.
१२. श्रीम. वानखेडे शैला रामदासराव (श्रीम. सारंग शैला भगवानराव), राजहंस, ब्लॉक नं. २०, रामनगर हाऊसिंग सोसायटी, हनुमानगढ रोड, रामनगर, नांदेड, महाराष्ट्र पिन- ४३१ ६०५.
१३. श्री. हर्षानंद पंजाबराव खोब्रागडे, राजगृह, जूना आजीस्पूर रोड, राजेश्वर नगर, सागवन, बुलढाणा, महाराष्ट्र पिन- ४४३ ००१.
१४. श्री. शेडमाके संजय पुरूषोत्तमः एच २२/७०४ इंद्रप्रस्थ हाऊ. सोसायटी, प्रतिक्षा नगर बस डेपो जवळ, सायन, मुंबई- ४०० ०२२ .
१५. श्री. हेरकळ सुरेंद्र चंद्रकांत, सर्व्हे नं. १७६, २१२५, शेंडे हॉस्पिटल जवळ, ढमाळवाडी, भेकराईनगर, फुरसुंगी, पुणे- ४१२ ३०८.
१६. निवडनस्ती (मशि-१)